भारतीय विद्या भवनचे

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

मुंशी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई.

**वन महोत्सव कालावधीत वृक्ष लागवडीचा वृत्तांत - सन २०१६**

वैश्विक उष्णतेमध्ये होणारी वाढ व हवामानातील प्रतिकूल बदल, यांची तीव्रता व परिणामकारकता कमी करण्याचा भाग म्हणून, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभाग व इतर विभाग आणि जनतेच्या सहभागातून सन २०१६ मधील पावसाळ्यात, १ ते ७ जुलै या **"वन महोत्सव"** कालावधीमध्ये १ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी किमान २ कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविलेले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वृक्षाच्छादन वाढवून हरित महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी दूरगामी आणि प्रभावीपणे उपयोग होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या या महत्वाकांक्षी उपक्रमाचा भाग म्हणून, सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय येथे दि. १ जुलै २०१६ रोजी, सामुदायिक वृक्षारोपणाचा कार्यक्रम, प्राचार्य डॉ. प्रियदर्शी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली, पार पडला. संस्थेच्या सर्व शिक्षकीय व आशिक्षकीय कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेवून अंदाजे १०० फुलझाडे व ५० विविध प्रकारची रोपे, अशी एकूण १५० वृक्षांची लागवड संस्थेच्या आवारात केली.



या उपक्रमासाठी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण रोपांच्या उपलब्धतेसाठी श्री. अरुण जगताप यांनी तर हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी श्री. सिद्धेश्वर शेटकर, श्री. अनिल शिंदे, प्रा. डॉ. राहुल दहातोंडे यांनी विशेष प्रयत्न केले. या पूर्वीही संस्थेने अश्या प्रकारचे उपक्रम राबविले असून, पावसाळ्यात लागवड केलेल्या वृक्षांना उन्हाळ्यात जगविण्यासाठी श्री. वसंतकुमार यांनी अपरिमित कष्ट घेतलेले आहेत.

सदर उपक्रमाच्या माध्यमातून राबविलेल्या वृक्ष लागवडीमुळे संस्थेचा परिसर सर्व ऋतूंमध्ये हरित व शीतल राहण्यास मदत होत आहे.



